**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२२/०९/२०२६

***डेंग्यू, मलेरिया व डासजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी महानगरपालिकेची विशेष मोहीम***

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया तसेच इतर डासजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विशेष प्रतिबंधात्मक उपाययोजना व जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.
या अंतर्गत शहरातील विविध भागांत फॉगिंग (धूर फवारणी), औषध फवारणी, अळी सर्वेक्षण व निर्मूलन, डासांची उत्पत्तीस्थळे शोधून त्यावर आवश्यक उपाययोजना तसेच संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त फवारणी करण्यात येत आहे. सोसायटी मिटिंग, कॉर्नर मिटिंग आणि प्रत्यक्ष जनजागृतीद्वारे नागरिकांना डासजन्य आजारांपासून बचावासाठी आवश्यक खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.
जनजागृती मोहिमेअंतर्गत शहरातील सोसायट्या, प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यालये, आरोग्य केंद्रे व गर्दीच्या ठिकाणी एकूण ४१२२१ जनजागृतीपर पोस्टर्स लावण्यात आले आहेत.

*डेंग्यू प्रतिबंधाची सुरुवात घरापासून*
डेंग्यूचा प्रसार करणारा एडीस डास घराच्या आसपास पाणी साठविणाऱ्या विविध भांड्यांमध्ये, विशेषतः स्वच्छ व साचलेल्या पाण्यात पैदास होऊ शकतो. अगदी कमी प्रमाणात साचलेले पाणीही डासांच्या उत्पत्तीचे ठिकाण बनू शकते. त्यामुळे नागरिकांनी पाण्याच्या टाक्या, ड्रम, बादल्या व इतर पाणीसाठे घट्ट झाकणाने किंवा स्वच्छ कपड्याने झाकून ठेवावेत. कुंड्या, फ्लॉवरपॉटच्या ट्रे, बाटल्या, टायर, नारळाच्या करवंट्या तसेच पाणी साचू शकणाऱ्या वस्तूंची नियमित तपासणी करून साचलेले पाणी काढून टाकावे. आठवड्यातून एक दिवस 'ड्राय डे' पाळून घर व परिसरातील पाणी साठण्याची ठिकाणे स्वच्छ व कोरडी ठेवावीत.

*घरोघरी तपासणीसाठी सहकार्य करा*
डासांची उत्पत्तीस्थळे शोधणे, अळी सर्वेक्षण करणे आणि आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिकेचे आरोग्य कर्मचारी घरोघरी तसेच विविध आस्थापना व परिसरात भेटी देत आहेत. नागरिकांनी आरोग्य पथकांना तपासणीसाठी आवश्यक सहकार्य करावे आणि विभागाकडून देण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक सूचनांचे पालन करावे.

*डासांची उत्पत्ती आढळणाऱ्या ठिकाणी दंडात्मक कारवाई*

महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत बांधकाम सुरू असलेली ठिकाणे, भंगार दुकाने व साठवणूक केंद्रे, टायर दुकाने, नर्सरी, सोसायटी परिसर तसेच इतर संभाव्य डास उत्पत्तीस्थळांची नियमित तपासणी व पुर्नतपासणी करण्यात येत आहे.
ज्या ठिकाणी एडीस डासांची उत्पत्ती अथवा अळी आढळून आली आहे, अशा संबंधित मालक, कंत्राटदार, संस्था, सोसायटी व्यवस्थापन किंवा जबाबदार व्यक्तींना यापूर्वीच प्रतिबंधात्मक सूचना व नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. डासांची उत्पत्तीस्थळे तात्काळ नष्ट करून आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.
त्यानंतरही संबंधितांनी आवश्यक उपाययोजना न केल्यास आणि पुर्नतपासणीमध्ये पुन्हा डासांची उत्पत्ती अथवा अळी आढळून आल्यास, NCVBDC च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तसेच स्थानिक स्वराज्य संस्था किंवा राज्य शासनाच्या लागू अधिसूचना, निर्देश, नियम व वैधानिक तरतुदींनुसार संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. आवश्यकतेनुसार लागू सार्वजनिक आरोग्यविषयक कायदे व महानगरपालिकेला प्राप्त वैधानिक अधिकारांनुसार पुढील प्रशासकीय/कायदेशीर कार्यवाहीदेखील करण्यात येईल.
त्यामुळे बांधकाम व्यावसायिक, कंत्राटदार, भंगार व्यवसायिक, टायर विक्रेते, नर्सरी चालक, सोसायटी व्यवस्थापन तसेच सर्व संबंधित आस्थापना व संस्थांनी महानगरपालिकेच्या सूचनांची गांभीर्याने दखल घेऊन आपल्या परिसरात डासांची उत्पत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

*नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक*
डासजन्य आजारांचा प्रतिबंध ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून महानगरपालिका आणि नागरिकांच्या संयुक्त प्रयत्नांतूनच प्रभावी डास नियंत्रण शक्य आहे. महानगरपालिका आपल्या स्तरावर आवश्यक त्या उपाययोजना सातत्याने राबवत असून नागरिकांनीही आपल्या घरापासून परिसरापर्यंत स्वच्छता राखून पाणी साचू न देणे, 'ड्राय डे' पाळणे आणि आरोग्य पथकांना सहकार्य करणे आवश्यक आहे.

*डासांची उत्पन्नी होण्यापूर्वीच ती रोखूया ;*
*डेंग्यू, मलेरिया व डासजन्य आजारांना आळा घालूया !*